नियमीत फौजदारी खटला क्र. **१६९/२०२४**
निशाणी क्र. **२२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **नाजिर आली शाकीर अली सिद्धकी** |
| वय सुमारे | : | २७ वर्षे, व्यवसाय : मजूरी |
| निवासस्थान | : | मु. धोकवडे, वॉटर फ्रेंड बिल्डींग, ता. अलिबाग |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. ०८/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:३० वॉटर फ्रेंड बिल्डींग, धोकवडे येथे घडली होती. तेथे मी पी.ओ.पी.चे काम करत होतो. मी सकाळी झोपून उठलो होतो. माझ्यासोबत ६ ते ७ लोक होते. त्यानंतर दोन लोक इमारतीच्या आत आले. काहीतरी बाहेर टाकल्यासंदर्भात ते लोक आमच्यावर आरोप करत होते. त्या लोकांनी आम्हाला गेटबाहेर काढले. त्या लोकांनी 'भैय्यांनो' अशी शिवीगाळ केली होती. त्यांनी मला पाईपने उजव्या खांद्यावर मारले होते व लाकडी काठीने कंबरेवर मारले होते. त्यामुळे मी पत्र्याच्या दरवाज्यावर पडलो. मला लागले होते त्यामुळे मला सिव्हील हॉस्पीटलमध्ये भरती करण्यात आले होते. मला ज्या लाकडी काठीने मारले ती दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली लाकडी काठी तिच आहे. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट–१** (**MO-1**) देण्यात येते. पोलीसांनी माझा हॉस्पीटलमध्ये जबाब घेतला होता. मला माझी फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. २३** देण्यात येते. आरोपी आज न्यायालयात हजर नाहीत. आरोपींना मी ओळखू शकत नाही कारण की,

आरोपींची नावे मला माहीत नाही. (आरोपी आज न्यायालयात हजर आहेत परंतु साक्षीदार त्यांना ओळखू शकत नाही.)

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे नाही की, आज कोर्टात हजर असलेल्या दोन्ही आरोपींनी मला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जे आज कोर्टात हजर आहेत त्यांनी मला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मी ओळखत नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रेम कश्यप व नसीम चौधरी यांना देखील त्या इसमांनी मारहाण केली होती.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ करीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे नाही की, आज हजर असलेल्या आरोपींना मी कधीही पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपींविरुद्ध कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गावातील असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, कोणी मारहाण केली होती हे मला आठवत नाही.

**आरोपी क्र. १ तर्फे उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी क्र. २ करीता वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हा शेजारीच राहात असल्यामुळे त्याला मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, ०८ तारखेच्या

घटनेमध्ये आरोपी क्र. २ नव्हता. आरोपी क्र. २ हा तेथे हजर होता परंतु त्याने काहीही सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क. २ ने मला मारहाण केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटना कम्पाउंडच्या आत घडली होती.

**आरोपी क्र. २ तर्फे उलटतपास पूर्ण**.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०३/११/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१६९/२०२४**
निशाणी क्र. **२४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **राजेश आत्माराम पाटील** |
| वय सुमारे | : | ४३ वर्षे, व्यवसाय : शेती व सेक्युरिटी |
| निवासस्थान | : | मु. कावाडे, पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. घटना दि. ०८/०८/२०२४ रोजी घडली. मला साईटवर बोलावून घेण्यात आले होते. तेथे गेल्यावर गावातील लोक जमा झाले होते. आमचे कामगार आतमध्ये होते. त्यानंतर गावातील लोक व कामगारांमध्ये बोलाचाली झाली. त्यानंतर शिवीगाळ व मारामारी झाली होती. मारामारी गेटच्या बाहेर झाली होती व मी गेटच्या आत होतो. मी गेटबाहेर आल्यावर पाहिले होते की, कामगारांना मारहाण करत होते. त्यानंतर १० मिनिटांनी त्या ठिकाणी पोलीस आले. पोलीस गावकऱ्यांना व कामगारांना घेवून पोलीस ठाण्यात गेले.

०२. १३ तारखेला पोलीस पंचनामा करण्यासाठी साईटवर आले होते. पोलीसांनी पंचनाम्यावर माझी सही घेतली होती. पंचनामा सायं. ४:०० वाजता सुरु होवून ५:०० वाजता संपला. पंचनाम्याच्या वेळी पोलीस पाटील, पोलीस व मी हजर होतो. घटनास्थळ फिर्यादी नाजीर अली याने दाखवले होते. मला पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–२** म्हणजेच **निशाणी क्र. २५** देण्यात येते.

०३. पोलीसांनी मला पुन्हा पोलीस ठाण्यात बोलावले होते. मला तारीख आठवत नाही. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकणार नाही. मारहाण करणारे आरोपी आज न्यायालयात हजर नाहीत.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)**

**उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी काठी जप्त करण्यासाठी मला पोलीस ठाण्यात बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रशांत गावंड यांनी काठी आणली होती व पोलीस ठाण्यात जमा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या सहीचे लेबल लावले व काठी जप्त केली. हे म्हणणे खरे आहे की, प्रशांत गावंड यांनी पोलीस ठाण्यात काठी जमा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रशांत गावंड आज न्यायालयात हजर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मटेरियल ऑब्जेक्ट–१ काठी पोलीसांनी जप्त केली होती.

**उलटतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपी क्र. १ करीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत** :

०५. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ माझ्या माहितीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील मजकूर मी वाचून पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, काठी सहज उपलब्ध होते. हे मला माहीत नाही की, काठी पोलीस ठाण्यात पोलीसांच्या टेबलवर होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रशांत गावंड याने माझ्या समक्ष काठी पोलीसांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की,

पोलीसांनी सांगितल्यामुळे प्रशांत गावंडने काठी दिली असे मी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रशांत गावंड पोलीस ठाण्यात हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रशांत गावंड पोलीस ठाण्यात हजर होते हे मी खोटे सांगत आहे.

**आरोपी क्र. १ चा उलटतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपी क्र. २ करीता वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत** :

आरोपी क्र. १ चा उलटतपास स्वीकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०३/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१६९/२०२४**
निशाणी क्र. **३०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **किशोर अनंत पाटील** |
| वय सुमारे | : | ५७ वर्षे, व्यवसाय : सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक |
| सध्या नेमणूक | : | मांडवा सागरी पोलीस ठाणे |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. १०/०८/२०२४ रोजी मी मांडवा सागरी पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. गुन्हा रजि. क्र. ८६/२०२४ चा तपास वरिष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. तपासकाम माझ्याकडे आल्यानंतर सर्वप्रथम मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला पी—२/निशाणी क्र. २५ कडील तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी घटनास्थळाचा नकाशा व फोटो काढले. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळाचा नकाशा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—३** म्हणजेच **निशाणी क्र. ३१** देण्यात येते.

०२. मी गुन्ह्यात वापरलेली काठी जप्त केली. त्याचा पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यास **पी—४** म्हणजेच **निशाणी क्र. ३२** देण्यात येते. मी जप्त मुद्देमाल काठी पोलीस ठाण्यात जमा करुन मुद्देमाल पावती फाडली. आता मला दाखवण्यात आलेली मुद्देमाल पावती तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—५** म्हणजेच

**निशाणी क्र. ३३** देण्यात येते. मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. दुखापतीचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता हॉस्पीटलला पत्र दिले. आता मला दाखवण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी–६** म्हणजेच **निशाणी क्र. ३४** देण्यात येते. माझ्या तपासात आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळाल्याने मी आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ करीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

**प्रस्तुत केसमधील इतर साक्षीदार तपासायचे असल्यामुळे उलटतपास तहकूब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०८/०४/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.